॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

जळगाव १६ ( ) आपत्तीच्या प्रसंगी उपयोगात येणारी यंत्रणा व समन्वय महत्वाचा आहे तसेच काही घटना घडल्यास अडकलेल्यांना वाचविण्यासाठी सदैव सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती निवारण अधिकारी, नरविर रावल यांनी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती सप्ताहच्या कार्यशाळेप्रसंगी केले.

महाराष्ट्र राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगाव व एस.डी.आर.एफ धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने १४ मार्च, २०१८ ते २० मार्च, २०१८ या कालावधीत प्रशिक्षण व जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाची ४ थी कार्यशाळा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आज दिनांक १६ मार्च रोजी संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील होते. यावेळी व्यासपीठावर विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे, राज्य आपत्ती प्रतिसाद दल,धुळे येथील पोलीस निरीक्षक के.व्ही पवार उपस्थित होते. नरविर रावल पुढे म्हणाले की, सुरक्षीततेच्या दृष्टीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे जागृत आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत, बचावकार्य व प्रथमोपचार याबाबतीत सुरक्षा रक्षकांना मार्गदर्शन केले. तसेच मास्टर ट्रेनर एस.पी.चौधरी यांनी आपत्कालीन समयी काय करावे व काय करू नये याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी उष्माघात, अतिवृष्टी, पुर, वादळ तसेच आकस्मीत लागणारी आग, भुकंप इत्यादीबाबतचे मदत व बचावकार्य बाबतीत व्यवस्थापन तसेच प्रतिसाद दल करीत असलेले कार्य प्रशंसनीय असल्याचे सांगितले.

इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर अडकलेल्यांना दोरीच्या सहाय्याने काढणे, स्ट्रेचरवरून पिडीतांना खाली उतरविणे, लहान बालकांची सुटका आदी अनेक चित्तथरारक प्रात्यक्षिके या दलाच्या जवानांनी सादर केले. तसेच महापूर, प्रलय वेळी मानव निर्मित साहित्याच्या उपयोगाने अनेकांचे प्राण वाचविण्यास मदत होईल यासाठी उपयोगात येणारे साहित्य यात प्रामुख्याने बोट, पंप, चप्पू, लाईफ जॅकेट, फुटबॉल, हॅन्डबॉल, शिट हॉरनेस, स्क्रु कॅरेनिबर, मिटॉन आदींबाबत माहिती विशाल पाटील, वसिम शेख यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा.दीपक सोनवणे यांनी मानले.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. १६ मार्च, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**
कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी